# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांक:२अ/एडीएम/२००९/२१५५
दिनांक :- 22 JUL 2009

प्रति,
**प्राचार्य/संचालक ,**
संचालनालयाच्या अधिनस्त सर्व विनाअनुदानीत अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था

विषय : अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांमधील होणा-या प्रवेशाबाबत.....

शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या सर्व संस्थांना कळविण्यात येते की, शासकीय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान होणा-या प्रवेश फेरीमध्ये प्रवेश ॲलॉट केलेल्या उमेदवारांनी **संस्थेमध्ये प्रवेश निश्चित केल्यास त्याची माहिती त्याच वेळेस त्वरीत संगणकावर अपडेट करून संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी** जेणेकरून प्रवेशित उमेदवारांचे प्रवेश वेळोवेळी अद्ययावत होऊन कट ऑफ डेटनंतर प्रवेश अपलोड केल्यामुळे संस्थेवर होणारी दंडात्मक कारवाई टाळता येईल.

तसेच जर संस्थांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्याची माहिती विहीत कालावधीत संगणकावर अपडेट केली नाही तर ती जागा रिक्त धरून पुढील प्रवेश फेरीसाठी सदर जागा ग्राहय धरली जाईल आणि सदर उमेदवाराचा प्रवेश संबंधित संस्थेला संस्थास्तरावरील जागेवर समायोजित करावा लागेल. असे करताना प्रवेश क्षमतेपेक्षा जादा प्रवेश झाल्यास होणा-या कारवाईस सर्वस्वी संस्था जबाबदार असेल.

तसेच प्रत्येक अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तकात दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. अल्पसंख्यांक कोटा, संस्थास्तरावरील कोटा, असोसिएशनमार्फत भरावयाच्या जागांचे प्रवेशही संचालनालयाने दिलेल्या कट ऑफ डेटच्या मुदतीत संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपडेट करणे आवश्यक आहे. या कोटयांमधील प्रवेश संचालनालयाने अभ्यासक्रमनिहाय दिलेल्या विहीत मुदतीत अपडेट न झाल्यास संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

( डॉ. एस. के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

जा.क्र.विकापु/विवि/प्रथम वर्ष प्रवेश/ 6236 दिनांक :22 JUL 2009

प्रत : या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व पदवी व पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन संस्थांना कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचारालनालय, मुंबई यांनी पत्र क्र. २अ/एडीएम/२००९/२१५५ दिनांक २२/०७/२००९ मध्ये पत्रात नमुद केल्या प्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री. एस.बी. शिन्दे प्रोग्रॅमर यांना सुचित करण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.